**M. S. P. Mandal's**

# Shivchhatrapati College, Aurangabad
# Internal Quality Assurance Cell



7.2.1 Describe two best practices successfully implemented by the Institution as per NAAC format provided in the Manual

**Best Practice-II: Shivchhatrapati for career development**

## Media coverage

Principal
Shivchhatrapati College,
Aurangabad

SHIVCHHATRAPATI COLLEGE
SEAL
AURANGABAD

# 'आविष्कार' स्पर्धेमध्ये छत्रपती कॉलेजच्या २२ विद्यार्थ्यांचे यश



**प्रतिनिधी** | औरंगाबाद

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातर्फे आयोजित आंतरमहाविद्यालयीन विद्यापीठीय 'आविष्कार' स्पर्धेत शिवछत्रपती महाविद्यालयातील २२ विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या स्पर्धा प्रकारांत उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. यात 'एनिमल हस्बँडरी' या प्रकारात एमएस्सी बायोटेक द्वितीय वर्षाचे विद्यार्थी रोहन नरेंद्र गांगुर्डे, आदित्य सीताराम गिरे यांनी तृतीय पारितोषिक पटकावले. 'प्युअर सायन्स' प्रकारात दत्तप्रसाद लक्ष्मण तळनकर, विशाल अंबादास सोळंके यांनी तृतीय पारितोषिक मिळवले. रोहन नरेंद्र गांगुर्डे, दत्तप्रसाद लक्ष्मण तळणकर या विद्यार्थ्यांची सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ येथे होणाऱ्या आविष्कार स्पर्धेसाठी निवड झाली आहे. डॉ. विद्या डोफे, प्रा. विशाल जैस्वाल यांनी मार्गदर्शन केले. या यशाबद्दल प्रदीप चव्हाण, प्राचार्य डॉ. आर. पी. पवार, उपप्राचार्या डॉ. संगीता राजमाने, उपप्राचार्य प्रा. भरत वहाटुळे, मराठी विभागप्रमुख डॉ. वैजनाथ कदम आदींनी त्यांचे अभिनंदन केले.

Principal
Shivchhatrapati College,
Aurangabad

SHIVCHHATRAPATI COLLEGE · AURANGABAD · SEAL

# वक्तृत्व स्पर्धेत तेजस्विनी केंद्रे द्वितीय



**औरंगाबाद** | राष्ट्रीय स्तरावरील वक्तृत्व स्पर्धेत मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाच्या शिवछत्रपती महाविद्यालयाची विद्यार्थिनी तेजस्विनी केंद्रेने द्वितीय क्रमांक पटकावला. माजलगाव येथील सुंदरराव सोळंके महाविद्यालयाने सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त ४ जानेवारी रोजी स्पर्धेचे आयोजन केले होते. या यशाबद्दल प्राचार्य डॉ. आर. पी. पवार, उपप्राचार्य प्रा. भरत वहाटुळे, मराठी विभागप्रमुख डॉ. वैजनाथ कदम, पर्यवेक्षक प्रा. विनायक काठेवाडे, पर्यवेक्षक प्रा. ज्ञानेश्वर धोत्रे आदींनी तेजस्विनीचे अभिनंदन केले.

Principal
Shivchhatrapati College,
Aurangabad

SHIVCHHATRAPATI COLLEGE
SEAL
AURANGABAD

# तेजस्विनी केंद्रेला वक्तृत्व चषक

म. टा. प्रतिनिधी, औरंगाबाद



विद्याभारती देवगिरी प्रांत शिक्षा संस्थेच्या सातव्या वाग्देवता वक्तृत्व सरस्वती चषक स्पर्धेतील विजेते स्पर्धक.

विद्याभारती देवगिरी प्रांत शिक्षा संस्थेचा सातवा वाग्देवता वक्तृत्व सरस्वती चषक यंदा तेजस्विनी केंद्रे हिने पटकावला. ती सलग दुसऱ्यांदा चषकाची मानकरी ठरली. शनिवारी धर्मवीर संभाजी विद्यालयात स्पर्धा घेण्यात आली. 'माझा भारत-नवे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण राष्ट्रउत्थानाचे साधन' असा या स्पर्धेचा विषय होता.

संस्थेच्या वतीने कै. मनोहर करंदीकर स्मृतिप्रित्यर्थ १६ ते २५ वयोगटातील विद्यार्थ्यांसाठी वाग्देवता वक्तृत्व स्पर्धा घेण्यात येते. पंडित दिनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष सर्जेराव ठोंबरे अध्यक्षस्थानी होते. संस्थेच्या मंत्री डॉ. मधुश्री सावजी, विद्याभारतीचे अध्यक्ष मुकेश गोयंका, मार्गदर्शक मालती करंदीकर, धर्मवीर शाळेचे मुख्याध्यापक नारायण बाभुळगावकर, प्रकाश पोतदार, प्रकाश बाविस्कर, दिनेश देशपांडे, रमाकांत सरोदे, महेश कुलकर्णी यांच्या उपस्थितीत स्पर्धेचे उद्घाटन झाले.

प्रथम विजेती तेजस्विनी केंद्रे हिला सात हजार रुपये, वाग्देवता फिरता सरस्वती चषक आणि प्रमाणपत्र देण्यात आले. द्वितीय, तृतीय पारितोषिक म्हणून अनुक्रमे पाच व तीन हजार रुपये, प्रमाणपत्र देण्यात आले. पत्रकार अजिनाथ शिंदे व भरत रिडलोन यांनी परीक्षक म्हणून काम पाहले. औरंगाबाद जिल्हा व जालना येथून १२ स्पर्धकांनी भाग घेतला होता. अर्चना नरसापूर, डॉ. गौरी देशपांडे, लता पाठक, नागेश जोशी यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.

स्पर्धेतील विजेते पुढीलप्रमाणे : प्रथम : तेजस्विनी केंद्रे, द्वितीय : जालिंदर जगताप व पौर्णिमा तोतेवाड, तृतीय : अक्षय काकडे, उत्तेजनार्थ : राम जाधव, अथर्व पळसकर, रामेश्वर कांबळे, भागवत लाड, संदीप कोळेकर, संकेत पवळे, विशाल थोटे, अश्विनी घुगे.

Principal
Shivchhatrapati College,
Aurangabad

SHIVCHHATRAPATI COLLEGE
SEAL
AURANGABAD

✿औरंगाबाद ✿जालना ✿परभणी ✿हिंगोली ✿बीड आणि नांदेड जिल्ह्यात वितरित होणारे विभागीय दैनिक

दैनिक रोखठोक
# वृत्त टाइम्स
निर्भिड, निःपक्ष, सडेतोड

RNI No.-MAHMAR/2012/47460

Email:-dai- ikvruttatimes@gmail.com
औरंगाबाद/मराठवाडा
Post Regd No-G/RNP/AGD-395/2013-15

छत्रपती संभाजीनगर ● वर्ष ११ वे ● अंक १५५ वा ●मंगळवार ●दिनांक ०४ जूलै २०२३ ●पाने-०४ ● किं २ रुपये

## शिवछत्रपती महाविद्यालयात रंगला नेहरू युवा केंद्राचा युवा महोत्सव;विविध कलाप्रकारांचे देखणे सादरीकरण।



छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी : नेहरू युवा केंद्र औरंगाबाद, युवा कार्यक्रम व खेळ मंत्रालय भारत सरकार यांच्या वतीने सिडकैतील शिवछत्रपती महाविद्यालयात सोमवारी, 3 जुलै रोजी जिल्हा युवा महोत्सव चांगलाच रंगला. जिल्ह्यातील विविध महाविद्यालयांच्या कला संघानी विविध कला आणि लोककला प्रकारांचे सादरीकरण करून उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. युवा महोत्सवाअंतर्गत भाषण, चित्रकला, फोटोग्राफी, कविता लेखन, समूह सांस्कृतिक स्पर्धा अशा पाच स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.

Principal
Shivchhatrapati College,
Aurangabad

SHIVCHHATRAPATI COLLEGE • AURANGABAD • SEAL

लोकमत समाचार

## एक नजर...

# प्रतियोगिताओं में मारी बाजी, मिला पुरस्कार



छत्रपति संभाजीनगर में बुधवार को विभिन्न स्पर्धा के पुरस्कार विजेता विद्यार्थी व उपस्थित प्राध्यापक.

**छत्रपति संभाजीनगर :** शिवछत्रपति महाविद्यालय सिडको एन-3 में हाल ही में हिंदी दिवस के उपलक्ष्य में हिंदी सप्ताह का आयोजन किया गया. 15 से 21 सितंबर के बीच आयोजित कार्यक्रम में काव्य पाठ, भाषण, गीत-गायन व भित्तिपत्र प्रतियोगिताएं हुईं. पुरस्कार वितरण समारोह बुधवार को आयोजित किया गया. काव्य पाठ में वैष्णवी मदन प्रथम, लोंढे वैष्णवी द्वितीय, समा दिंडे तृतीय व गंगा मारेकर को प्रोत्साहन पुरस्कार मिला. गायन प्रतियोगिता में सुमित जाधव प्रथम, श्वेता समादिंडे द्वितीय, अंकिता दंडारे तृतीय व नीशा यादव ने प्रोत्साहन पुरस्कार प्राप्त किया. वक्तृत्व में शेलके रितिका वसंत प्रथम, मेटकर आकाश द्वितीय, पल्लवी खरे तृतीय और वाकले कृष्णा को प्रोत्साहन पुरस्कार मिला. वहीं भित्तिपत्र प्रतियोगिता में शुभांगी काले प्रथम, झोटे ऋतुजा माणिक द्वितीय, राजेजायव रेणुका राजू तृतीय व नम्रता किशोर लांडगे को प्रोत्साहन पुरस्कार देकर सम्मानित किया गया. इस अवसर पर सविता लोंढे, सविता भालेराव, मारोति गायकवाड़, संगीता राजमाने, शाहू चव्हाण, डॉ वैजनाथ कदम, डॉ सत्वशीला जाधव, डॉ महादेव सजगणे, प्रा युवराज मिसाल आदि उपस्थित थे.

Apna Shahar
Page No. 4 Sep 28, 2023
Powered by: erelego.com

Principal
Shivchhatrapati College,
Aurangabad

SHIVCHHATRAPATI COLLEGE SEAL AURANGABAD

# विभागीय शालेय कॅरम स्पर्धेसाठी शिवछत्रपती कॉलेज खेळाडूंची निवड

छत्रपती संभाजीनगर : मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित शिवछत्रपती महाविद्यालयातील अकरावी व बारावीमध्ये शिकणारे विद्यार्थी खेळाडूंची विभागीय शालेय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. जिल्हास्तरीय शालेय कॅरम स्पर्धेमध्ये शिवछत्रपती कॉलेजच्या खेळाडूंनी पहिल्या तीन स्थानांत स्थान पटकावले.

या कामगिरीबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. पी. पवार, डॉ. टेकाळे, उपप्राचार्य भरत वहाटुळे, सुपरवायझर रवी पाटील यांनी खेळाडूंचे अभिनंदन केले. महाविद्यालय क्रीडा विभागातर्फे डॉ. रणजीत पवार, प्रा. किशोरी हिवर्डे यांनी सन्मय हिवाळे, अक्षय भोळे, तसेच मुलींमध्ये पलक साळुंखे या खेळाडूंना मार्गदर्शन केले आहे.



Principal
Shivchhatrapati College,
Aurangabad

SHIVCHHATRAPATI COLLEGE · SEAL · AURANGABAD

## संक्षिप्त



निवड झालेल्या खेळाडूंचे अभिनंदन करताना प्राचार्य डॉ. आर. पी. पवार, भारत वाहाटुळे आदी.

# स्पर्धेसाठी निवड झालेल्या खेळाडूंचा सत्कार

**छत्रपती संभाजीनगर :** मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचालित शिवछत्रपती महाविद्यालयाच्या अंडर-१९ मधील खेळाडूंची राज्यस्तरीय पिप साईड एअर रायफल शूटिंग स्पर्धेमध्ये निवड झाल्याबद्दल महाविद्यालयाच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयातर्फे आयोजित राज्यस्तरीय पिप साईड एअर रायफल शूटिंग स्पर्धेमध्ये सम्राट शिंदे, आर्यन तोमर, पार्थ कुलकर्णी व रिया थत्ते यांची एअर पिस्टल १० मीटर या क्रीडा प्रकारात निवड झाली आहे. याबद्दल प्राचार्य डॉ. आर. पी. पवार, उप प्राचार्य भरत वाहाटुळे, महाविद्यालय विकास समिती सदस्य प्रदीप चव्हाण, पर्यवेक्षक संजय राऊत, क्रीडा विभागप्रमुख डॉ. रणजित पवार आदींनी खेळाडूंचा सत्कार करत त्यांना स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

Principal
Shivchhatrapati College,
Aurangabad

SHIVCHHATRAPATI COLLEGE · SEAL · AURANGABAD



# शिवछत्रपती महाविद्यालयातर्फे खुशी सिंग, भाग्यश्री चव्हाणचा सत्कार

छत्रपती संभाजीनगर : मशिप्र संचलित शिवछत्रपती महाविद्यालयातील खेळाडू खुशी सिंग, भाग्यश्री चव्हाण यांची डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातर्फे चंदीगड येथे होणाऱ्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ जिम्नॅस्टिक्स स्पर्धेसाठी निवड झाली आहे. शिवछत्रपती महाविद्यालय विकास समिती सदस्य प्रदीप चव्हाण यांच्या हस्ते खुशी सिंग व भाग्यश्री चव्हाण या खेळाडूंचा स्मृतिचिन्ह, ट्रॅक सूट, प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्र पवार, उपप्राचार्य प्रा. भरत वहाटुळे उपस्थित होते. क्रीडा विभागातर्फे डॉ. अर्चना कोल्हे, डॉ. रणजीत पवार यांचे या खेळाडूंना मार्गदर्शन लाभले आहे.

Principal
Shivchhatrapati College,
Aurangabad

SHIVCHHATRAPATI COLLEGE · SEAL · AURANGABAD

सामना

# शिवछत्रपती महाविद्यालयात मुलींची बाजी

मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचालित शिवछत्रपती महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी गुणवत्तेची परंपरा राखत घवघवीत यश संपादन केले असून, महाविद्यालयाचा निकाल ९३.८६ टक्के लागला आहे. या परीक्षेत मुलींनी बाजी मारली आहे.

कला, वाणिज्य आणि विज्ञान शाखेच्या घोषित निकालात सर्वाधिक ९८.३७ टक्के निकाल वाणिज्य शाखेचा लागला आहे. कला शाखेचा निकाल - ८५.१० टक्के लागला असून, ९४ विद्यार्थी परीक्षेला बसले होते. यापैकी ८० विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. यामध्ये रेणुका गोल्हार ही विद्यार्थिनी प्रथम आली असून तिने ८७.५० टक्के गुण मिळविले आहेत. द्वितीय- गौरी भादे (८७.३३टक्के), तृतीय-आरती नरवये (८०.३३टक्के) व सूर्यवंशी समीक्षा गोविंदराव (८०.३३ टक्के), विज्ञान शाखेचा ९८.१३ टक्के निकाल लागला असून, ४२० विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. सारा सोनवणे ८५.५ टक्के गुण मिळवून प्रथम आली आहे. द्वितीय - सानिका कुलकर्णी (८४.५ टक्के), तृतीय - ऋतुजा लेंभे (८१.३३टक्के) गुण घेऊन उत्तीर्ण झाली. वाणिज्य शाखेचा निकाल ९८.३७ टक्के लागला आहे. या परीक्षेत १८२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. यामध्ये प्रथम - अनुष्का पांडे (९५.६६ टक्के), द्वितीय- अश्विनी रामगिरी (९४.८३ टक्के) तृतीय- दिग्विजय शितोळे (९२.६६ टक्के) व पुलक अतुलकुमार साहूजी हा ९२.६६ टक्के गुण प्राप्त करून यशस्वी ठरला आहे. सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष आमदार प्रकाश सोळंके, सरचिटणीस आमदार सतीश चव्हाण, महाविद्यालय विकास समितीचे सदस्य प्रदीप चव्हाण, प्राचार्य डॉ. आर.पी. पवार, उपप्राचार्य डॉ. संगीता राजमाने, उपप्राचार्य प्रा. भरत वहाटुळे, पर्यवेक्षक प्रा. संजय राऊत व प्रा. ज्ञानेश्वर धोत्रे आदींनी अभिनंदन केले.



अनुष्का पांडे, अश्विनी रामगिरी, दिग्विजय शितोळे, पुलक साहुजी, रेणुका गोल्हार, गौरी बढे, आरती नरवये, समीक्षा सूर्यवंशी, सारा सोनवणे, सानिका कुलकर्णी, ऋतुजा लेंभे

Sambhajinagar Edition
May 26, 2023 Page No. 8
Powered by : eReleGo.com

Principal
Shivchhatrapati College,
Aurangabad

SHIVCHHATRAPATI COLLEGE AURANGABAD SEAL

लोकमत

# शिवछत्रपती महाविद्यालयाला अभिनयाचे प्रथम पारितोषिक

लोकमत न्यूज नेटवर्क

**छत्रपती संभाजीनगर :** शिवछत्रपती महाविद्यालयातील बीए तृतीय वर्षाच्या वैष्णवी भागवत या विद्यार्थिनीने राष्ट्रीय पातळीवरील अभिनय स्पर्धेत वैयक्तिक प्रथम क्रमांकाचे पारितोषिक पटकावले.



पारितोषिकप्राप्त विद्यार्थ्यांचे कौतुक करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर.पी. पवार. सोबत डॉ. गहिनीनाथ वळेकर, डॉ. सुनील टेकाळे.

पुणे येथील अखिल लोककला कल्चरल ऑर्गनायझेशनतर्फे १ ते १६ मे दरम्यान आयोजित राष्ट्रीय पातळीवरील नृत्य, नाट्य संगीत स्पर्धेत येथील शिवछत्रपती महाविद्यालयातील नाट्यशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांनी ११ मे रोजी नाट्याचे सादरीकरण केले होते. नाट्य युवा गटामध्ये वैष्णवी भागवत या विद्यार्थिनीस वैयक्तिक अभिनयाचे प्रथम पारितोषिक मिळाले. १६ मे रोजी पुण्यातील अण्णाभाऊ साठे सभागृहात वैष्णवीला समारंभपूर्वक पारितोषिक प्रदान करण्यात आले.याशिवाय महाविद्यालयाच्या नाट्यसंघास द्वितीय पारितोषिक मिळाले. अस्मिता गोडाम, वर्षा पऱ्हाड, संकेत सुरडकर, करण भदरगे या कलावंत विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट नाट्याभिनय सादर केला. त्यांना नाट्यशास्त्र विभागप्रमुख डॉ. गहिनीनाथ वळेकर यांचे मार्गदर्शन लाभले. पारितोषिक प्राप्त विद्यार्थ्यांचे मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव आ. सतीश चव्हाण, अध्यक्ष प्रकाश सोळंके, महाविद्यालय विकास समितीचे सदस्य प्रदीप चव्हाण, प्राचार्य डॉ. आर. पी. पवार, प्रा. भारत शिरसाठ, आदिनाथ जाधव, राहुल चव्हाण आदींनी कौतुक केले.

Principal
Shivchhatrapati College,
Aurangabad

SHIVCHHATRAPATI COLLEGE · AURANGABAD · SEAL

दिव्य मराठी
दिव्य सिटी 30-12-2022

# शिवछत्रपती कॉलेजचे वादविवाद स्पर्धेत यश

## बीएच्या रितिका शेळकेला द्वितीय बक्षीस



रितिका शेळके हिचे अभिनंदन करताना प्राचार्य डॉ.आर.पी. पवार, डॉ. संगीता राजमाने, डॉ. वैजनाथ कदम, प्रा. भरत वहाटुळे, प्रा. राहुल भागवत.

**प्रतिनिधी** | औरंगाबाद

मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक विनायक रावजी पाटील स्मृती समारोह-२०२२ निमित्त २८ डिसेंबर रोजी देवगिरी महाविद्यालयात आयोजित केलेल्या ४४ व्या आंतरमहाविद्यालयीन राज्यस्तरीय वादविवाद स्पर्धेत औरंगाबाद येथील शिवछत्रपती महाविद्यालयाची बीए प्रथम वर्षाची विद्यार्थिनी रितिका शेळके हिने द्वितीय पारितोषिक पटकावले.

स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र व रोख सहा हजार रुपयांची रक्कम असे पारितोषिकाचे स्वरूप आहे. 'भारतीय राजकारण समाजकारणापासून दूर जात आहे' या विषयावर शेळकेने विचार मांडले. या यशाबद्दल प्राचार्य डॉ. आर. पी. पवार, उपप्राचार्या डॉ. संगीता राजमाने, उपप्राचार्य प्रा. भरत वहाटुळे, पर्यवेक्षक प्रा. संजय राऊत, प्रा. ज्ञानेश्वर धोत्रे, मराठी विभागप्रमुख डॉ. वैजनाथ कदम, प्रा. सुहास सोळंके, आयक्यूएसीचे प्रमुख प्रा. राहुल भागवत आदींनी तिचे अभिनंदन केले.

Principal
Shivchhatrapati College,
Aurangabad

SHIVCHHATRAPATI COLLEGE · AURANGABAD · SEAL